# 'बौद्धिक संपदा अधिकाराची ओळख, प्रकार व नोंदणी प्रक्रिया '
# या विषयावरील एकदिवसीय आंतरशाखीय

राज्यस्तरीय कार्यशाळा दि. २० डिसेंबर २०२०

## अहवाल

अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष श्री पंडितगुरु पार्डीकर महाविद्यालय, कै रमेश वरपुडकर महाविद्यालय , सोनपेठ व वसुंधरा महाविद्यालय, घाट नांदूर यांच्या संयुक्त विद्यमाने **'बौद्धिक संपदा अधिकाराची ओळख, प्रकार व नोंदणी प्रक्रिया '** या विषयावरील एकदिवसीय आंतरशाखीय राज्यस्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

एकदिवसीय आंतरशाखीय राज्यस्तरीय कार्यशाळेचे उद्देश खालील प्रमाणे होते .

१. बौद्धिक संपदा अधिकार संकल्पनेचा उगम व विकास यावर सविस्तर चर्चा करणे .

२. बौद्धिक संपदा अधिकाराचे स्वरूप, महत्व व व्याप्ती जाणून घेणे.

३. बौद्धिक संपदा अधिकार , पेटेंट व कॉपी राईट कायदा : फरक याबाबद सविस्तर जाणून घेणे.

४. बौद्धिक संपदा अधिकार संबंधी भारतीय कायदे समजून घेणे .

५ . बौद्धिक संपदा अधिकार आणि भारतीय उद्योग व अर्थव्यवस्था याबाबद जाणून घेणे .

६ बौद्धिक संपदा अधिकार व भारतीय संशोधन याबाबद सविस्तर चर्चा करणे .

७ . बौद्धिक संपदा अधिकार व सामाजिक शास्त्रे व कला शाखामधील संधी बबद उहापोह करणे
.

**प्रस्तुत चर्चासत्र हे चार सत्रामध्ये घेण्यात आले**

१ सत्र पहिले -उद्घाटन सत्र


२ सत्र दुसरे - ' बौद्धिक संपदा अधिकार : ओळख, जाणीव जागृती –डॉ.एम डी सिरसाट

३ सत्र तिसरे ' बौद्धिक संपदा अधिकार : प्रकार व प्रक्रिया '' –प्राचार्य डॉ .एम एम बेटकर

४ सत्र चौथे-समारोप .

**सत्र पहिले -उद्घाटन सत्र**

दि .२० डिसेंबर २०२० वार रविवार रोजी सकाळी ठीक ११:०० मी ' बौद्धिक संपदा अधिकार : ओळख, प्रक्रिया व संधी' या विषयावरील एकदिदसीय आंतरशाखीय राज्यस्तरीय कार्यशाळेचे उद्घाटन झाले उद्घाटन सत्राचे अध्यक्ष म्हणून रामेश्वर शिक्षण संस्था सोनपेठ चे संस्थात्मक अध्यक्ष मा.व्यंकटराव कदम हे होते तर प्रमुख उद्घाटक म्हणून डॉ.एम डी सिरसाट संचालक अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष ,डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विध्यापीठ औरंगाबाद हे होते तर विशेस उपस्थित म्हणून प्राचार्य डॉ वसंतराव सातपुते , प्राचार्य डॉ अरुण दळवे , प्राचार्य डॉ एच पी कदम हे होते .




या प्रसंगी उद्घाटक डॉ.एम डी सिरसाट ' बौद्धिक संपदा अधिकार : ओळख व नोंदणी प्रक्रिया ' याबाबद बोलताना म्हणाले कि बौद्धिक संपदा हि देशाची अशी संपदा आहे कि ज्याद्वारे आपण प्रत्येक व्यक्तीचे ,व्यक्तीद्वारे समाजाचे आणि समाजाद्वारे देशाचे कल्याण करता येवू शकते . ' बौद्धिक संपदा हि अशी अमूर्त बाब आहे कि त्याचे संरक्षण करणे हि २१ शतकातील अत्यंत अवश्यक अशी बाब झाली आहे आणि आपण त्याचे जतन करणे ही देशाच्या बौद्धिक आणि आर्थिक विकाससाठी महत्वपूर्ण आहे.असे मत त्यांनी व्यक्त केले..या सत्राचे प्रास्ताविक डॉ ए व्ही जाधव यांनी केले तर सत्राचे सूत्रसंचालन प्रा डॉ अल्का देशमुख यांनी केले.

**सत्र दुसरे - 'बौद्धिक संपदा अधिकार : ओळख, जाणीव जागृती –डॉ.एम डी सिरसाट.**




**बौद्धिक संपदा अधिकार : ओळख व जाणीव जागृती'** या विषयावरील एकदिवसीय आंतरशाखीय राज्यस्तरीय कार्यशाळेचे दुसऱ्या सत्राचे अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ वसंतराव सातपुते, कै रमेश वरपुडकर महाविद्यालय , सोनपेठ, हे होते तर प्रमुख संसाधन व्यक्ती तथा मार्गदर्शक म्हणून डॉ.एम डी सिरसाट संचालक अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष ,डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विध्यापीठ औरंगाबाद हे होते . डॉ.एम डी सिरसाट यांचा परिचय प्रा विक्रम धन्वे यांनी करून दिला . या सत्रात मार्गदर्शन करताना डॉ.एम डी सिरसाट यांनी बौद्धिक संपदा हि संकल्पना स्पष्ट केली त्याच सोबत ही अमूर्त संपदा ही प्रत्येक व्यक्तीचे आणि देशाचे शैक्षनीक आणि बौद्धिक जीवनमान आणि स्तर

उंचावण्याचे कार्य करते .पाश्चिमात्य देशाच्या तुलनेत आपल्या देशात या बाबत म्हणावी तेवढी जाणीव जागृती झालेली नाही ,परतु अलीकडे वैज्ञानिक क्षेत्रात याबबद चांगली प्रगती झालेली आहे.

बौद्धिक संपदा कमावण्यासाठी अथवा संपादित करण्यासाठी काही विशेष असे खास प्रयत्न करावे लागतात.ते खालील क्षेत्रात होणे गरजेचे आहे,

Late. Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani

१ जैव तंत्रज्ञान

२ रासायनिक संशोधन

३ अभियान्त्रिक संशोधन

४ नाविन्यपूर्ण संशोधन

पेटंट च्या बाबतीत भौगोलिक संकेतांचा प्रभाव आढळून येतो ,जसे कि पैठण ची पैठणी ,कुलू ची शाल इत्यादी .या सत्राचा अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ वसंतराव सातपुते यांनी केला .या सत्राचे आभार प्रा डॉ जी बी सवणे यांनी केले .या सत्राचे सूत्रसंचालन प्रा डॉ अल्का देशमुख यांनी केले.

**सत्र तिसरे –: संपदा अधिकार : प्रकार व प्रक्रिया ‘’ –प्राचार्य डॉ .एम एम बेटकर**




तृतीय सत्राचे अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ अरुण दळवे वसुंधरा महाविद्यालय, घाट नांदूर, हे होते तर प्रमुख संसाधन व्यक्ती तथा मार्गदर्शक म्हणून **प्राचार्य डॉ .एम एम बेटकर** (प्राचार्य श्री कुमारस्वामी महाविद्यालय औसा) हे होते. परिचय प्रा डॉ मुकुंद पाटील यांनी करून दिला. **प्राचार्य डॉ .एम एम बेटकर** मार्गदर्शण करताना म्हणाले की **बौद्धिक संपदा अधिकार** हा अत्यंत महत्वाचा विषय असून पश्चिमात्य जगतात खास करून युरोप व अमेरिका या खंडात याला अनन्यसाधारण असे महत्व दिले जाते .भारतात देखील अलीकडच्या काळात विशेषता विज्ञान क्षेत्रातील लोक संशोधनात्मक दृष्टीकोनातून महत्व देत आहेत .हा विषय जितका वैज्ञानिक संशोधनाशी निगडीत आहे तितकाच वाणिज्य क्षेत्राशी देखील निगडीत आहे कारण व्यावसायिक दृष्ट्या नवनिर्मिती चा सर्वांना लाभ मिळावा हा त्याचा उद्देश आहे .या संशोधनात नवनिर्मिती आणी सर्जनशीलता असल्यामुळे पेटंट चे अधिकार बहाल केले जातात.

या क्षेत्रात विशेष नाविन्यपूर्ण संशोधन करणे हे **बौद्धिक संपदा अधिकाराच्या** कक्षेत येते .या प्रकारच्या संशिधानामुळे देशातील तरुणांची शैक्षनीक आणि बौद्धिकपातळी उंचावण्यस तशेस आर्थिक प्रगती होण्याश सहाय्यभूत ठरते .

बौद्धिक संपदा चार प्रकारात वर्गीकरण करण्यात येतात त्या खालील प्रमाणे –

१ डिझाईन/ नक्षी तथा कोरीव संशोधन

२ कॉपीराईट

३.पेटंट

४ ट्रेडमार्क/व्यापारचिन्ह

या प्रकार बाबद सविस्तर मार्गदर्शन केले त्याच सोबत्याचा संरक्षण कालावधी हा २० वर्षाचा असतो तो परत पुनर्नोदणी करून वाढवला जाऊ शकतो . बौद्धिक संपदा - डिझाईन/ नक्षी तथा कोरीव संशोधन , कॉपीराईट,पेटंट, ट्रेडमार्क (व्यापारचिन्ह) याच्या अधिकाराचे उल्लंघन होत आहे असे आढळून आल्याश त्या विरोधात नुकसान भरपाईची दावा दाखल केला जाऊ शकतो अथवा टे नकली शंशोधन बाजारातून काढून घेतले जाऊ शकते .

‘ **बौद्धिक संपदा अधिकाराची** कॉपीराईट, पेटंट , ट्रेडमार्क (व्यापारचिन्ह), डिझाईन/ नक्षी तथा कोरीव संशोधन , प्राकृतिक निर्देशक या प्रकारात विभागणी केली जाते हे स्पट करून यामुळे जगाच्या सर्वोत्तम व्याव्स्तेचा वापर प्रत्येक देशाला घेता येतो व मानवी कल्यान साधता येते असे प्रतिपादन केले .या प्रसंगी अध्यक्ष म्हणून डॉ अरुण दळवे विशेस उपस्थित म्हणून प्राचार्य डॉ वसंतराव सातपुते प्राचार्य डॉ एच पी कदम हे होते .या सत्राचा अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ अरुण दळवे यांनी केला .या सत्राचे आभार प्रा डॉ विठ्ठल जायभाये यांनी केले ,या सत्राचे सूत्रसंचालन प्रा डॉ अल्का देशमुख यांनी केले.

**सत्र चौथे –समारोप**

‘**बौद्धिक संपदा अधिकाराची ओळख, प्रकार व प्रक्रिया** ‘ या विषयावरील एकदिवसीय आंतरशाखीय राज्यस्तरीय कार्यशाळेच्या समारोप सत्राचे अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ वसंतराव सातपुते, कै रमेश वरपुडकर महाविद्यालय , सोनपेठ, हे होते तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्राचार्य डॉ अरुण दळवे तर विशेष उपस्थतीत म्हणून प्राचार्य डॉ एच पी कदम हे होते .यावेळी प्राचार्य डॉ अरुण दळवे यांनी भारतातील पौराणीक ग्रंथाचा आधार घेत भारतीतल पौराणिक ग्रंथ हे भारतीतल संशोधकाला मार्गदर्शक म्हणून त्यांचा चिकित्सक व वैज्ञानिकपणे करणे गरजेचे आहे असे मत व्यक्त केले.

Late. Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth
Dist. Parbhani




या सत्राचा अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ वसंतराव सातपुते यांनी करत असताना या नवख्या विषयावरील कार्यशाळेच्या माध्यमातून **बौद्धिक संपदा अधिकाराची प्रक्रिया व ओळख** सर्व सहभागी होणार्या शिक्षकांना झाली याचे समाधान व्यक्त केले व याचा फायदा येत्या काळात सर्वांना होईल असा आशावाद व्यक्त केला. या सत्राचे प्रास्ताविक डॉ जे व्ही तुडमे यांनी केले यांनी केले तर आभार आभार प्रा डॉ विठ्ठल जायभाये यांनी केले ,या सत्राचे सूत्रसंचालन प्रा डॉ अल्का देशमुख यांनी केले.

या **बौद्धिक संपदा अधिकाराची ओळख, प्रक्रिया व संधी'** या विषयावरील एकदिवसीय आंतरशाखीय राज्यस्तरीय कार्यशाळेस वरील पाच महाविद्यालयातील एकूण १६९ प्राध्यापकांनी सहभाग नोंदवला.

प्राचार्य
डॉ वसंतराव सातपुते
PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar Arts. & Com College, Sonpeth Dist. Parbhani

प्राचार्य
डॉ अरुण दळवे
Principal
Vasundhara College, Ghatnandur Tq. Ambajogai, Dist. Beed

प्राचार्य
डॉ एच पी कदम
प्राचार्य
श्री पंडितगुरु पार्डीकर महाविद्यालय
सिरसाळा ता.परळी-वै.जि.बीड

Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani